# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोननं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १३०-२२** **दिनांक :- ०९/०५/२०२२**

## वाहन चोरी करणा-या आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार पोलीसांना यश.

दिनांक २४/०४/२०२२ रोजी ००.३० वा. ते ०५.०० वा. दरम्यान पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत जायका हॉटेल समोर, पेल्हार रोड, वाकणपाडा, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यांनी त्यांची टाटा कंपनीची ३११८ मॉडेलची ट्रक क्रं.एम.एच.०४/ई.वाय. ९९४२ हि उभी करुन ठेवलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी नामे. श्री. समीम अस्लमअली खान, धंदा-चालक, रा. वाकणपाडा, नालासोपारा (पु.), यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीता विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I ३६२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे दिनांक २४/०४/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

त्याचप्रमाणे दिनांक २५/०४/२०२२ रोजी रात्री २०.०० वा. ते दिनांक २६/०४/२०२२ रोजी ०८.०० वा. चे दरम्यान नसिमभाई यांचे सर्विस सेंटर समोर, वंगणपाडा, पो. पेल्हार, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यांनी त्यांचे टाटा कंपनीचा ४०७ मॉडेलचा टेम्पो क्रं.एम.एच.०४/एफ.जे. २५७९ हा पार्क करुन ठेवलेला असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेल्याने फिर्यादी नामे. श्री. सोमनाथ बाबासाहेब नरुटे, व्यवसाय- चालक, रा. गवराईपाडा, वसई (पु.), ता. वसई, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द पेल्हार पो. स्टे. गु.रजि.नं. I ३६७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दिनांक २६/०४/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरील गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळास भेट देवून गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहितीच्या व तांत्रीक मदतीच्या आधारे आरोपी नामे. १) ओमप्रकाश राममनी यादव, रा. जि. प्रयागराज, राज्य-उत्तरप्रदेश, २) बिल्ली ऊर्फ चंद्रकांत रामचंद्र शेनोरे, रा. सिन्नर, जि. नाशिक यांना वर नमुद गुन्हयांत अटक करुन त्यांचेकडून चोरीस गेलेला ट्रक व टेम्पो असा एकुण-९,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ व श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, तसेच पोहवा/नामदेव ढोणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.